SUCCESS KEY TEST SERIES

X- Semi

(Unit Test-1 His & Poli(Semi ,Ch- 1,2,3 & 1))

इतिहास व राज्यशास्त्र -

DATE:

TIME: 2 तास

MARKS: 40

SEAT NO:

प्र.१ (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून लिहा. **(2)**

1) ..... मध्ये 'नॅशनल फिल्म अर्काइव्ह' या संस्थेची मुख्य कचेरी आहे.
अ. पुणे ब. मुंबई क. सातारा ड. नागपुर

2) भारताचे राष्ट्रीय अभिलेखागार ..... येथे आहे.
अ. दिल्ली ब. कोलकाता क. मुंबई ड. चेन्नई

(ब) पुढीलपैकी प्रत्येक गटातील चुकीची जोडी दुरुस्त करून पुन्हा लिहा. **(2)**

1) i. इंडियन म्युझियन - कोलकाता
ii. नॅशनल फिल्म अर्काइव्ह ऑफ इंडिया - मुंबई
iii. नॅशनल अर्काइव्ह ऑफ इंडिया - दिल्ली
iv. कासपठार - सातारा (पश्चिम घाट)

2) i. काझीरांगा राष्ट्रीय उदयान - 1985
ii. सुंदरबन राष्ट्रीय उदयान - 1980
iii. फ्लॉवर्स राष्ट्रीय उदयान - 2005
iv. कांचनगंगा राष्ट्रीय उदयान - 2016

प्र.२ (अ) दिलेली संकल्पनाचित्रे पूर्ण करा. (कोणतीही एक) **(2)**

1)



2)



(ब) टीपा लिहा. (कोणतीही एक) **(2)**

1) इतिहासलेखनाची परंपरा.

2) मौखिक साधने

प्र.३ (अ) पुढील विधाने सकारण स्पष्ट करा. (कोणतीही दोन) **(6)**

1) भारतीय संस्कृतीचा इतिहास इसवी सनापूर्वी तिस-या सहस्त्रकापासून किंवा त्याच्याही मागे जातो.

2) प्रादेशिक इतिहासलेखनाला चालना मिळाली.

3) जागतिक वारशांच्या पदास पात्र ठरणारी स्थळे, परंपरा यांची यादी युनेस्कोद्वारे जाहीर केली जाते.

4) बरनीने इतिहासलेखनाची व्याप्ती अधिक विस्तारली.

5) गोविंद सखाराम सरदेसाई रियासतकार म्हणूनही ओळखले जातात.

(ब) पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतीही दोन) **(6)**

1) झियाउद्दीन बरनीने इतिहासलेखनाचा कोणता हेतू स्पष्ट केला आहे?

2) तत्त्वज्ञान म्हणजे काय ?

3) ऐतिहासिक वारसास्थळांच्या संदर्भात युनेस्कोने कोणते कार्य केले आहे?

प्र.४ दिलेल्या उताऱ्याचे वाचन करून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा. **(4)**

जगातील सर्वात प्राचीन समजले जाणारे (इ.स.पू. ६ वे शतक) संग्रहालय मेसोपोटेमियातील 'उर' या प्राचीन शहराचे उत्खनन करताना सापडले.
हे उत्खनन ब्रिटिश पुरातत्त्वज्ञ सर लिओनार्ड वुली यांनी १९२२ ते १९३४ या काळात केले होते. हे संग्रहालय एनिगॉल्डी नावाच्या मेसोपोटेमियाच्या
राजकन्येने बांधले होते. ती स्वतः त्या संग्रहालयाची संग्रहपाल म्हणून काम पाहत असे. या संग्रहालयात सापडलेल्या प्राचीन वस्तूंसोबत त्या वस्तूंचे
सविस्तर वर्णन करणाऱ्या मातीच्या वटिका (clay tablets) होत्या.

i. जगातील सर्वात प्राचीन संग्रहालय कोठे सापडले?
ii. 'उर' येथील संग्रहालय कोणी बांधले?
iii. 'उर' येथील संग्रहालय कोणी शोधले?

प्र.५ पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा. (कोणतेही एक) **(4)**

1) उपयोजित इतिहासाचा वर्तमानकाळाशी कसा सहसंबंध असतो ?

2) इतिहासाच्या साधनांचे जतन व्हावे यासाठी किमान १० उपाय सुचवा

राज्यशाष्त्र

प्र.६ दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय लिहा. **(2)**

1) लोकशाहीचा गाभा म्हणजे .....
अ. प्रौढ मताधिकार ब. सत्तेचे विकेंद्रीकरण क. राखीव जागांचे धोरण ड. न्यायालयीन निर्णय

2) महाराष्ट्रात स्थानिक शासनसंस्थांमध्ये महिलांसाठी ..... जागा राखीव ठेवण्यात आलेल्या आहेत.
अ. २५% ब. ३०% क. ४०% ड. ५०%

प्र.७ पुढील विधाने चूक की बरोबर ते सकारण स्पष्ट करा. (कोणत्याही दोन) **(4)**

1) भारतीय लोकशाही जगातील सर्वात मोठी लोकशाही मानली जाते.

2) संविधानाचे स्वरूप एखाद्या जिवंत दस्तऐवजाप्रमाणे असते.

3) माहितीच्या अधिकारामुळे शासनाच्या कारभारातील गोपनीयता वाढली आहे.

प्र.८ पुढील संकल्पना स्पष्ट करा. (कोणतीही एक) (2)

1) अल्पसंख्याकविषयक तरतुदी

2) हक्काधारित दृष्टिकोन

प्र.९ पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतीही दोन) (4)

1) मतदाराचे वय २१ वर्षांवरून १८ वर्षे केल्यामुळे कोणते परिणाम झाले ?

2) सामाजिक न्याय प्रस्थापित करणे म्हणजे काय ?

3) लोकसभेतील महिलांचे प्रतिनिधित्व

4) राखीव जागाविषयक धोरण लिहा.